नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई
दिनांक- २६.०३.२०२५

मा.प्रकल्प संचालक, ना.दे.कृ.सं.प्र. मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम कृषि विकास समितीच्या दि.०२.०४.२०२५ रोजीच्या वेबिनारसाठी पुर्वतयारीच्या अनुषंगाने दि. २६.०३.२०२५ रोजी झालेल्या ऑनलाइन बैठकीमध्ये उपविभाग आणि तालुका स्तरावरून उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत -

१. ज्या तालुक्यामध्ये कर्मचारी संख्या कमी आहे अशा ठिकाणी संबंधित गावांचे ग्रामविकास अधिकारी/ तलाठी/ कृषीसखी/ पशुसखी/ अंगणवाडी सेविका यांना ही प्रकल्प कार्यक्रम समजावून सांगून त्यांना उपस्थित राहणे बाबत संबंधित गट विकास अधिकारी/ तहसीलदार व इतर विभागांशी समन्वय साधून सदर कर्मचारी उपस्थित राहतील असे आदेश देण्यात यावेत.
२. पेसा गावातील पेसा मोबीलायझर (ग्रामपंचायत स्तर), पेसा मॅनेजर आणि पेसा ट्रेनर यांना देखील आमंत्रित करून प्रकल्प ग्राम कृषि विकास समिती कार्यक्रमास उपस्थित राहणे बाबत सूचना देण्यात यावे.
३. प्रोजेक्टर नसल्यास प्रोजेक्टर व्यतरिक्त इतर उपलब्ध दूरसंचार साधने/ उपकरणे उपलब्ध होईल असे पाहावे.
४. मालेगाव तालुक्यातील दोन किंवा अधिक ग्रामपंचायतीच्या सदस्यांना एक ठिकाणी एकत्रित प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे किंवा या ठिकाणी संबंधित गावांचे ग्रामविकास अधिकारी/ तलाठी/ कृषीसखी/ पशुसखी/ अंगणवाडी सेविका यांना ही प्रकल्प कार्यक्रम समजावून सांगून त्यांना उपस्थित राहणे बाबत संबंधित गट विकास अधिकारी/ तहसीलदार व इतर विभागांशी समन्वय साधून सदर कर्मचारी उपस्थित राहतील असे आदेश देण्यात यावेत.
५. अतिदुर्गम भागांमध्ये जिथे सुव्यवस्थित इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे अशा ठिकाणी प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे तसेच या ठिकाणी प्रशिक्षणार्थी येण्या-जाण्याचा प्रत्यक्ष प्रवास खर्च देय राहील.

श्री. विजय कोळेकर
मृदा विज्ञान विशेषज्ञ
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई